Vol 5 Issue 8 May 2016 ISSN No : 2249-894X

Monthly Multidisciplinary Research Journal

# Review Of Research Journal

Chief Editors

**Ashok Yakkaldevi**
**A R Burla College, India**

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

**Welcome to Review Of Research**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2249-894X**

Review Of Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.


## Regional Editor

Manichander Thammishetty
Ph.d Research Scholar, Faculty of Education IASE, Osmania University, Hyderabad.

## *Advisory Board*

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Fabricio Moraes de AlmeidaFederal
University of Rondonia, Brazil

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Xiaohua Yang
University of San Francisco, San Francisco

Karina Xavier
Massachusetts Institute of Technology (MIT), USA

May Hongmei Gao
Kennesaw State University, USA

Marc Fetscherin
Rollins College, USA

Liu Chen
Beijing Foreign Studies University, China

Mabel Miao
Center for China and Globalization, China

Ruth Wolf
University Walla, Israel

Jie Hao
University of Sydney, Australia

Pei-Shan Kao Andrea
University of Essex, United Kingdom

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Ilie Pintea
Spiru Haret University, Romania

Mahdi Moharrampour
Islamic Azad University buinzahra Branch, Qazvin, Iran

Titus Pop
PhD, Partium Christian University, Oradea,
Romania

J. K. VIJAYAKUMAR
King Abdullah University of Science & Technology,Saudi Arabia.

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences
Al. I. Cuza University, Iasi

REZA KAFIPOUR
Shiraz University of Medical Sciences
Shiraz, Iran

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

Nimita Khanna
Director, Isara Institute of Management, New Delhi

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

P. Malyadri
Government Degree College, Tandur, A.P.

S. D. Sindkhedkar
PSGVP Mandal's Arts, Science and Commerce College, Shahada [ M.S. ]

Anurag Misra
DBS College, Kanpur

C. D. Balaji
Panimalar Engineering College, Chennai

Bhavana vivek patole
PhD, Elphinstone college mumbai-32

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut (U.P.)

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Sonal Singh
Vikram University, Ujjain

Jayashree Patil-Dake
MBA Department of Badruka College Commerce and Arts Post Graduate Centre (BCCAPGC),Kachiguda, Hyderabad

Maj. Dr. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

AR. SARAVANAKUMARALAGAPPA
UNIVERSITY, KARAIKUDI,TN

V.MAHALAKSHMI
Dean, Panimalar Engineering College

S.KANNAN
Ph.D , Annamalai University

Kanwar Dinesh Singh
Dept.English, Government Postgraduate College , solan

More.........


**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.ror.isrj.org**

ISSN: 2249-894X Impact Factor : 3.1402(UIF) Volume - 5 | Issue - 8 | May - 2016

Review Of Research






# भारतीय संविधान आणि देशाची निर्मिती

गोविंद नामदेव रावळेकर
मराठी विभाग , यशोदा गर्ल्स आर्टस् अ‍ॅन्ड कॉमर्स कॉलेज, स्नेहनगर,
वर्धा रोड, नागपूर.

## प्रास्ताविक

संविधान सभेवर सदस्यांचे निर्वाचन प्रांतीय विधानमंडळाच्या निर्वाचित सदस्यांद्वारे करण्यात आले. काँग्रेसच्या विरोधामुळे डॉ. आंबेडकर मुंबई विधानमंडळातून निर्वाचित होऊ शकले नाही. त्यामुळे त्यांनी बंगाल विधानमंडळातून श्री. जोगेंद्रनाथ मंडल आणि इतर अनुसूचित जातीच्या सदस्यांच्या पाठिंब्यावर संविधान सभेत प्रवेश मिळविला.

संविधान सभेने ९ डिसेंबर १९४६ रोजी स्वतंत्र भारताच्या निर्मितीच्या कार्याला प्रारंभ केला. उद्घाटन सभेत एकूण २९६ सदस्यांना सहभागी होण्याचा अधिकार होता. परंतु त्यापैकी फक्त २०७ सदस्यच उद्घाटनप्रसंगी उपस्थित होते. अनुपस्थितात प्रामुख्याने मुस्लिम लीगच्या सदस्यांचा समावेश होता.

## संविधान बैठक

भारताच्या संविधान सभेची प्रथम बैठक सोमवार दि. ९ डिसेंबर १९४६ रोजी अकरा वाजता संविधान सभागृह नवी दिल्ली येथे संविधान सभेने १० डिसेंबर १९४६ रोजी अध्यक्षांच्या निर्वाचनासंबंधी नियम पारीत केले. त्या नियमानुसार संविधान सभेने ११ डिसेंबर १९४६ रोजी डॉ. राजेंद्रप्रसाद यांना संविधान सभेचे स्थायी अध्यक्ष म्हणून निर्वाचित केले. १३ डिसेंबर १९४६ रोजी मा. पंडित जवाहरलाल नेहरू यांनी ध्येय आणि उद्दिष्टासंबंधात प्रस्ताव मांडला. १६ डिसेंबर १९४६ पर्यंत संविधान सभेची बैठक स्थगित करण्यात आली. १६ डिसेंबर रोजी संविधान सभेचे सत्रावसान झाले. मुस्लिम लगीचे सदस्य अनुपस्थित होते. मुंबईचे डॉ. एम. आर. जयकर यांनी संविधान सभेत ठराव मांडला ते म्हणाले–

‘‘ही संविधान सभा स्वतंत्र सार्वभौम गणराज्य असलेल्या भारताच्या भावी राज्यकारभाराशी संविधान निर्मितीचा संकल्प दृढ निष्ठेने आणि कठोर निर्धारपूर्वक घोषित करते. परंतु या संविधानाच्या निर्मितीत मुस्लिम लीग आणि हिंदुस्थानातील संस्थांनाचे सहकार्य मिळावे म्हणून या संकल्पाचा आधार अधिक दृढ व्हावा या हेतूने ही संविधान सभा या विषयावरील विचारविनिमय पुढील तिथीपर्यंत स्थगित करीत आहे.’’[१]

या संशोधन प्रस्तावाने सभागृहात तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले. या अशा तणावपूर्ण वातावरणात अध्यक्ष डॉ. राजेंद्रप्रसाद यांनी अनपेक्षितपणे डॉ. आंबेडकर यांना १७ डिसेंबर १९४६ रोजी आपले म्हणणे मांडण्यास्तव आमंत्रित केले. या ऐतिहासिक घटनेचे प्रत्यक्ष साक्षी श्री. एन. व्ही. गाडगीळ निवेदन करतात त्या अनुसार, ‘‘त्यांचे भाषण मुत्सद्यासारखे होते. त्यांच्या भाषणात कटुतेला कोणतेही स्थान नव्हते. त्यांचे भाषण मूलगामी आणि विवेकाला आव्हान करणारे होते. त्यामुळे संपूर्ण सभागृह

त्यांचे भाषण जीवाचे रान करून ऐकत होते. त्यांच्या भाषणानंतर टाळयांचा प्रचंड कडकडाट झाला. सभागृहाच्या परिसरात त्यांच्यावर अभिनंदनाचा एवढा वर्षाव झाला की त्यांना निश्चितच गुदमरल्या झाले असावे.''[२] संविधान सभेने 'ध्येय आणि उद्दिष्टांच्या' प्रस्तावावरील चर्चा पुढील सत्रापर्यंत स्थगित केली.

### संविधान सल्लागार समिती

२४ जानेवारी १९४७ च्या प्रस्तावाच्या आधारे सरदार पटेल यांच्या अध्यक्षतेखाली संविधान सभेने सल्लागार समिती गठीत केली. या समितीत ५० सदस्य होते. डॉ. बी. आर. आंबेडकर त्यापैकी एक सल्लागार समितीने खालील चार उपसमित्या नियुक्त केल्या. १. मूलभूत अधिकार उपसमिती २. अल्पसंख्याक समिती ३. उत्तरपूर्व आदिवासी सीमा प्रदेश उपसमिती आणि ४. वगळलेल्या आणि अंशतः वगळलेल्या प्रदेशासाठी (आसामातील प्रदेश सोडून) उपसमिती.

डॉ. आंबेडकर हे प्रथम दोन उपसमित्यांचे सदस्य होते. त्यांनी मूलभूत अधिकार उपसमितीला एक निवेदनही सादर केले. त्या निवेदनात त्यांनी आपल्या विचारांना मूर्त स्वरूप दिले. हे निवेदन व्यापक प्रसिध्दीस्तव 'स्टेट्स ॲन्ड मायनॉरिटीज, व्हॉट आर देअर राईटस् ॲन्ड हाऊ टू सेक्युलर देम इन दि कॉन्स्टीटयूशन आूफ फ्री इंडिया' या शीर्षकाखाली १५ मार्च १९४७ रोजी प्रकाशित झाले. संविधान सभेने आणखी इतर तीन समित्या नियुक्त केल्या त्यात - १. संघ अधिकार समिती २. संघ संविधान समिती आणि ३. प्रांतीय संविधान समिती. प्रथम दोन समित्यांचे अध्यक्ष पंडित जवाहरलाल नेहरू होते. तर तिसऱ्या समितीच्या अध्यक्षस्थानी सरदार वल्लभभाई पटेल होते. या समित्यांची स्थापना ३० एप्रिल १९४७ च्या प्रस्तावानुसार झाली.

### डॉ. बाबासाहेब आंबेडकर संविधान सभेवर पुनर्निर्वाचित

डॉ. आंबेडकर हे संघ संविधान समितीचे सदस्य होते. या समितीचा अहवाल संविधान सभेच्या अध्यक्षांना समितीचे अध्यक्ष पंडित जवाहरलाल नेहरू यांनी ४ जुलै १९४७ रोजी सादर केला. डॉ. आंबेडकरांनी विविध समित्यावर जे कार्य केले ते अत्यंत उपयोगी व मोलाचे मानले गेले आणि काँग्रेसच्या नेत्यांना निःसंकोचपणे खात्री पटली की डॉ. आंबेडकरांच्या सेवा घेतल्याशिवाय स्वातंत्र्याचे दृढीकरण आणि विधीनियमिकरण सहज सुलभ होणार नाही. बंगालच्या विभाजनावर परिणाम म्हणून डॉ. आंबेडकर संविधान सभेचे सदस्य राहिले नाही. संविधान सभेचे अध्यक्ष डॉ. राजेंद्रप्रसाद यांनी मुंबईचे तत्कालीन मुख्यमंत्री श्री. बी. जी. खेर यांना पाठविलेल्या ३० जून १९४७ च्या पत्रात डॉ. आंबेडकरांची संविधान सभेवर त्वरीत निवड व्हावी असे सुचविले. त्यांनी लिहिले ''अन्य बाबी सोबतच आम्हाला असे आढळून आले की, डॉ. आंबेडकरांनी संविधान सभेत आणि ज्या विविध समित्यांवर त्यांची नियुक्ती झाली होती त्या विविध समित्यांवर त्यांनी जे कार्य केले, त्यांनी जे योगदान दिले ते एवढे श्रेष्ठ दर्जाचे आहे की आम्ही त्यांच्या सेवांपासून वंचित राहू इच्छित नाही. ते बंगालमधून निर्वाचित झाले होते आणि त्या प्रांताचे विभाजन झाल्यामुळे आता ते संविधान सभेचे सदस्य राहिले नाहीत. १४ जुलैपासुन सुरू होणाऱ्या संविधान सभेच्या सत्रात त्यांनी उपस्थित रहावे याविषयी मी आतूर आहे. म्हणून त्यांचे त्वरित निर्वाचन होणे अगत्याचे आहे.''[३]

त्यानुसार १९४७ च्या जुलै महिन्यात डॉ. आंबेडकर संविधान सभेवर पुनर्निर्वाचित झाले. त्यानंतर लगेच १५ ऑगस्ट १९४७ ला स्वातंत्र्यदिनी प्रधानमंत्री पंडित जवाहरलाल नेहरू यांनी त्यांना मंत्रीमंडळात सहभागी होण्यासाठी निमंत्रित केले. डॉ. आंबेडकरांनी ते निमंत्रण स्वीकारले आणि ते भारताचे प्रथम विधीमंत्री झाले. २९ ऑगस्ट रोजी संविधान सभेने एकमताने त्यांची संविधान मसुदा समितीच्या अध्यक्षपदी निवड केली. या मसुदा समितीवर संविधानाचा मसुदा आलेखीत करण्याची जबाबदारी होती. २७ ऑक्टोबर १९४७ नंतर समितीच्या नियमित बैठकी झाल्या आणि संविधान सल्लागाराच्या कार्यालयाने प्रस्तावित मसुद्याच्या प्रत्येक अनुच्छेदाचा विचार केला. त्यांची उजळणी केली. त्यांचे पुनर्लेखन केले. समितीच्या बैठकी १३ फेब्रुवारी १९४८ पर्यंत एकूण ४४ दिवस भरल्या. यात डॉ. आंबेडरांनी स्वतः जातीने सर्व कार्यभर सांभाळला. मसुदा समितीने संविधानाचा प्रथम मसुदा २१ फेब्रुवारी १९४८ ला संविधान सभेच्या अध्यक्षांना सादर केला. संविधानाचा मसुदा ८ महिनेपर्यंत लोकांना चर्चेसाठी उपलब्ध होता आणि त्यानंतर हा मसुदा ४ नोव्हेंबर १९४८ रोजी संविधान सभेपुढे चर्चेसाठी सादर करण्यात आला.

### मसुदा समितीचे अध्यक्ष – डॉ. बाबासाहेब आंबेडकर

मसुदा समितीचे अध्यक्ष म्हणून डॉ. बाबासाहेब आबेडकरांनी केलेल्या मूलभूत कार्याची दखल संविधान निर्मात्री सभेने घेतली. संविधान मसुदा सादर झाल्यावर त्यावर बोलताना अनेक सदस्यांनी डॉ. आंबेडकरांच्या कामाची प्रशंसा केली. दि. ५ नोव्हेंबर १९४८ रोजी संविधान निर्मात्री सभेचे एक सदस्य मा. टी. टी. कृष्णम्माचारी म्हणाले– ''या सभागृहाला याची जाणीव असेल की याच सभागृहाने मसुदा समितीवर ज्या सात सदस्यांची नियुक्ती केली होती त्यापैकी एकाने या सभागृहाचा राजीनामा दिला म्हणून त्यांच्या जागी दुसऱ्यांना नियुक्त करण्यात आले. एका सदस्याचा मृत्यू झाला आणि ती जागा रिकामीच राहिली. एक सदस्य दूर अमेरिकेत निघून गेले आणि त्यांचीही जागा भरली गेलीच नाही. दुसरे एक सदस्य राज्याच्या राजकारणात व्यस्त होते. गुंतलेले होते आणि त्या प्रमाणात पोकळी निर्माण झाली होती. एक किंवा दोन सदस्य दिल्लीपासून फार दूर होते आणि कदाचित प्रकृती स्वास्थ्याच्या कारणास्तव त्यांनी बैठकीत भाग घेतलाच नाही. याचा अंतिम परिणाम असा झाला की या संविधानाचा मसुदा तयार करण्याची संपूर्ण जबाबदारी डॉ. आंबेडकर यांच्यावर आली आणि त्यांनी हे महत्वपूर्ण कार्य निःसंशय, अत्यंत समर्थपणे पूर्ण केले यात तिळमात्र शंका नाही याकरिता आम्ही त्यांचे कृतज्ञ आहोत''[४]

टी.टी.कृष्णम्माचारी प्रमाणेच हजर अनेक सदस्यांनी संविधानाच्या समुद्याचे श्रेय डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना दिले. गुरूवार दि. ४ नोव्हेंबर १९४८ ला संविधान सभागृह, नवी दिल्ली येथे भारताची संविधान सभा भरली. मध्यान्हीच्या सत्रात

अध्यक्षांनी डॉ. आंबेडकरांना प्रस्ताव मांडण्यासाठी आमंत्रित केले. त्यानुसार डॉ. आंबेडकरांनी संविधानाचा मसुदा विचारार्थ प्रस्तुत केला. त्यानंतर त्यावर संक्षिप्त चर्चा करण्यात आली. १५ नोव्हेंबर १९४८ रोजी संविधानाच्या दुसऱ्या वाचनास प्रारंभ झाला. दुसऱ्या वाचनात अनुच्छेदावर क्रमवार सविस्तर चर्चा झाली. ही चर्चा १७ ऑक्टोबर १९४९ ला समाप्त झाली. त्यानंतर तृतीय वाचनाकरिता १४ नोव्हेंबर १९४९ रोजी संविधान सभा पुन्हा भरली. हे सत्र २६ नोव्हेंबर १९४९ ला संपले.

यात्र सत्रात म्हणजेच दि. २५ नोव्हेंबर १९५० ला डॉ. बाबासाहेब आंबेडकर आपल्या घटनेवरील शेवटच्या भाषणात म्हणतात– ''जातीभेद आणि धर्मभेद हे आपले जुने–पुराणे शत्रू आहेत. नवीन–नवीन व निरनिराळी ध्येय पुढे ठेवून जे राजकीय पक्ष उत्पन्न झालेले आहेत व होणार आहेत त्यांची आता आपल्या जुन्या शत्रूंमध्ये भर पडणार आहे. पण एवढे मात्र खास की जर निरनिराळे पक्ष आपल्या देशापेक्षा आपल्या मतप्रणालींना जास्त महत्व देतील तर आपले स्वातंत्र्य पुन्हा दुसऱ्यांदा संकटात सापडेल आणि कदाचित कायमचेच नष्ट होईल. असले संकट आपणावर येऊ नये यासाठी आपण सर्वांनी जय्यत तयारी ठेवली पाहिजे. आपल्या अंगातला रक्ताचा शेवटचा बिंदू राहीपर्यंत आपण आपल्या स्वातंत्र्याचे संरक्षण प्राणपणाने करू असा आपण दृढनिश्चय केला पाहिजे.''[५] अशी प्रबळ वैचारिकता भारतीय नागरिकांकडून डॉ. आंबेडकरांना अपेक्षित आहे आणि ती खऱ्या अर्थाने कर्तृत्वातून स्वीकारली पाहिजे. त्यानंतर संविधान स्वीकृत झाले.

### *संविधानातील मूलभूत कर्तव्य*

नोव्हेंबर १९४९ साली जेव्हा संविधान निर्मितीचे कार्य पूर्ण झाले त्यावेळी संविधान सभेच्या सदस्यांची संख्या ३२४ ही होती. ब्रिटिश भारतातील प्रांत व संस्थानिक यांची संख्या अनुक्रमे २३५ व ८९ इतकी होती. भारतीय नागरिकांनी आपल्या भारत देशाच्या संरक्षणार्थ पालन करण्याकरिता काही 'मूलभूत कर्तव्य' संविधानामध्ये मांडलेली आहेत. ते अनुच्छेद (५१–क) प्रमाणे–

क)संविधानाचे पालन करणे आणि त्याचे आदर्श व संस्था, राष्ट्रध्वज व राष्ट्रगीत यांचा आदर करणे,
ब)ज्यामुळे आपल्या राष्ट्रीय स्वातंत्र्य लढयास स्फूर्ती मिळाली त्या उदात्त आदर्शाची जोपासना करून त्यांचे अनुसरण करणे.
ग)भारताची सार्वभौमता, एकता व एकात्मता उन्नत राहणे व त्याचे संरक्षण करणे.
घ)आवाहन केले जाईल तेव्हा देशाचे संरक्षण करणे व राष्ट्रीय सेवा बजावणे.
ड)धार्मिक, भाषिक व प्रादेशिक किंवा वर्गीय भेदांच्या पलीकडे जाऊन अखिल भारतीय जनतेमध्ये एकोपा व भ्रातृभाव वाढीला लावणे. स्त्रियांच्या प्रतिष्ठेला उणेपणा आणणाऱ्या प्रथांचा त्याग करणे.
च)आपल्या संमिश्र संस्कृतीच्या वारशाचे मोल जाणून तो जतन करणे.
छ)अरण्ये, सरोवरे, नद्या व वन्य जीवसृष्टी या सुध्दा नैसर्गिक पर्यावरणाचे रक्षण करून त्यात सुधारणा करणे आणि सजीव प्राण्याबाबत दयाबुध्दी बाळगणे.
ज)विज्ञाननिष्ठ दृष्टिकोन, मानवतावाद आणि शोषक बुध्दी व सुधारणावाद यांचा विकास करणे.
स)सार्वजनिक संपत्तीचे रक्षण करणे व हिंसाचाराचा निग्रहपूर्वक त्याग करणे.
भ)राष्ट्र सतत उपक्रम व सिध्दी यांच्या चढत्या श्रेणी गाठत जाईल अशाप्रकारे सर्व व्यक्तिगत व सामुदायिक कार्यक्षेत्रात पराकाष्ठेचे यश संपादन करण्यासाठी झटणे.
ह)सहा ते चौदा वर्षे पर्यंतच्या बालकांचे आई–वडील किंवा पालक, त्यांच्या बालकांना किंवा पाल्यांना जे लागू असेल त्याप्रमाणे शिक्षणाची संधी उपलब्ध करून देतील हे प्रत्येक भारतीय नागरिकाचे कर्तव्य असेल.''[६]

यावरून असे दिसते की, राज्यघटना लिहितांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सर्व भारतीय समाज अर्थात बहुजन समाज डोळयासमोर ठेवलेला होता. कारण कोणत्याही देशाची प्रगती किंवा आर्थिक स्थिती ही तेथील शेवटच्या घटकाला धरून करावी लागते. काही घटकांना मागे ठेवून कोणत्याही देश प्रगती करू शकत नाही. पण भारतात तर बहुसंख्य घटक हे दारिद्रयात आणि शोषणाचे बळी पडलेले आहेत. मूठभर लोकांच्या भरोश्यावर देशाचे रक्षण करता येत नाही असेच चित्र दीर्घकाळ राहिले म्हणून भारत निरनिराळया आक्रमकांना बळी पडलेला आहे असे भविष्यात होऊ नये आणि भारत कोणत्याही देशाचा गुलाम होऊ नये याचा विचार एकटया भिमाने केला असे म्हणावे लागेल. कारण शेवटच्या घटकाचा विचार एका भिमाशिवाय दुसऱ्याने केलेला नाही हे दलित, आदिवासी किंवा बहुजन समाज प्रबळ व मजबूत करण्याचे कार्य करणारा दुसरा नाही.

### *निष्कर्ष :*

आज आपण पाहात आहोत की देशात किती अजराकता माजलेली आहे. दहशतवादाला तोड नाही असे म्हटले जात असताना भारतीय संविधान हे आपल्या सार्वभौमत्वाची शिक्षण देताना दिसते. पण या संविधानाकडे भारतीय नागरिकांचे दुर्लक्ष झाले काय? त्यांना संविधानाबद्दल किती ज्ञान आहे? याची उजळणी करणे गरजेचे आहे. या भारतीय संविधानामध्ये जर आपण पाहाल तर सर्व जाती, धर्मसंस्कृती, आर्थिक, सामाजिक, बौध्दिक, समता, स्वतंत्रता, बंधुत्व, न्याय, या सर्व प्रणालीनी व्यापलेली दिसते. या संविधानात सर्व सर्वांचे हित करणेच असायला पाहिजे ते मानवापासून तर प्राण्यापर्यंत आणि निसर्गापर्यंत अशी अतिशय डोळस शिकवण भारतीय संविधान देते. तर आपण याकडे एक 'जीवनशैली' या दृष्टीने बघायलाच पाहिजे.

भारतीय नागरिकांनी जर का आपल्या कुटुंबाबरोबरच देशांची जोपासना करायच ठरवल तर एकजुटतेतून नक्कीच देशाची उन्नती साधता येईल आणि दहशतवादाचा नायनाट करता येईल. या संविधानाला तयार करण्यासाठी जो जोम आपण भारतीय असण्याच्या डॉ. आंबेडकरांनी लावला तो जोम, ती मेहनत जर प्रत्येक भारतीय नागरिकांनी लावली तर डॉ. आंबेडकरांना अपेक्षित

असलेला भारत देश हा 'बहुजन हिताय बहुजन सुखाय' या न्यायाने इतर देशाच्या तुलनेने अधिक प्रगतीशील होणाराच.

*संदर्भग्रंथ –*


१) गायकवाड, प्रदीप : 'भारताचे संविधान', दीक्षाभूमी संदेश प्रकाशन, लष्करीबाग, नागपूर-१७, प्र.आ. १४ एप्रिल २००० ते अकरावी आ. १ जानेवारी २००८, पृ. ४६.

२) तत्रैव, पृ. ४७

३)तत्रैव, पृ. ४८

४)तत्रैव, पृ. ४८-४६

५)आंबेडकर, बाबासाहेब : 'माझी आत्मकथा', सुधीर प्रकाशन, मु. बोरगांव (मेघे), पो. वर्धागंज, वर्धा, प्रकाशन वर्ष १४ एप्रिल २००६, पृ. ७३

६)उनि, पृ. २२८





*गोविंद नामदेव रावळेकर*

*मराठी विभाग , यशोदा गर्ल्स आर्टस् ॲन्ड कॉमर्स कॉलेज, स्नेहनगर, वर्धा रोड, नागपूर.*

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Books Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- Directory Of Research Journal Indexing
- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- DOAJ
- EBSCO
- Crossref DOI
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Review Of Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.ror.isrj.org